दाखल दिनांक : ०९/०१/२०१८
नोंदणी दिनांक : ०९/०१/२०१८
निकाल दिनांक: ०२/०३/२०१९
कालावधी : १ व. २ म. १ दि.

**<u>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, दारव्हा यांचे न्यायालय</u>**
(पिठासीन अधिकारी केतनकुमार तेलगांवकर)

**म.कौ.हिं.सं.अ. अर्ज क्र.१/२०१८** **निशानी क्र.१३**
CNR : MHYA070000552018

**अर्जदार**

**नसीम परवीन शेख ईरफान चोधरी**
वय अंदाजे २० वर्ष, धंदा : घरकाम.
रा. गवळीपुरा दारव्हा
ता. दारव्हा, जि. यवतमाळ.

**विरुध्द**

**गैरअर्जदार**

१) शेख ईरफान सुल्हान चौधरी
वय अं. ३० वर्ष, धंदा–मजूरी
२) सवारीवाला सलीम
वय अं.५० वर्ष, धंदा–व्यापार
रा.अचलपूर ता.अचलपूर जिल्हा अमरावती
३) ईक्बाल सुल्हान चौधरी

४) शमीना ईकबाल चौधरी

५) शरीफा सुल्हान चौधरी
६) युनुस चौधरी
७) सलीमाबानो रा.अचलपूर
गैरअर्जदार क्रं. १, ३ ते ६ सर्व राहणार गवळीपूरा नईबस्ती बडनेरा जिल्हा अमरावती

**अर्ज** : महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२, १७, १८, १९, २० आणि २२ अन्वये अर्ज.

.....................................................................................................

अर्जदारातर्फे : श्री.कु.एस.आर.कांबळे वकील साहेब.
गैरअर्जदार क्र.१,३ ते ५ तफे श्री.डि.एस.ताजी वकील साहेब

.....................................................................................................

## न्यायनिर्णय

( पारित दिनांक ०२ मार्च,२०१९ )

१. दिनांक २३.३.२०१७ रोजी अर्जदार हिचे गैरअर्जदार क्रं. १ सोबत मुस्लीम समाजातील रीवाजाप्रमाणे विवाह दारव्हा येथे झाला. गैरअर्जदार क्रं.३ हा गैरअर्जदार क्रं. १चा भावू आहे. गैरअर्जदसार क्रं. ४ शमीना ही गैरअर्जदार क्रं. ३ ईक्बाल यांची पत्नी आहे. गैरअर्जदार क्रं. ५ शरीफा ही अर्जदाराची सासू आहे. गैरअर्जदार क्रं. ६ युनूस हे अर्जदाराचे छोटे सासरे आहे. गैरअर्जदार क्रं. ७ सलीमा ही अर्जदाराची मामेसासू आहे.

२ अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, तिच्यावर सर्व गैरअर्जदारांनी मिळून शारिरिक, मानसिक आणि आर्थिक अत्याचार केलेला आहे. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, तिला गैरअर्जदारांनी शिवीगाळसुध्दा केलेली आहे. अर्जदाराचे महत्वाचे म्हणणे असे आहे की, तिच्या नव—याचे गैरअर्जदार क्रं. ४ सोबत अनैतिक संबंध आहे. या सर्व भानगडीमुळे अर्जदाराचे गैरअर्जदारांसोबत वादविवाद झाले त्याचा परिणाम म्हणून दिनांक १५.११.२०१७ रोजी सर्व गैरअर्जदारांनी मिळून अर्जदाराला हाकलून लावले. तेव्हापासून अर्जदार ही दारव्हा येथे आईवडीलांच्या घरी राहते आहे.

३ अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, तिचा नवरा मिस्त्रीकाम करतो

आणि तो तिला दरमहा दहा हजार रूपये पोटगी म्हणून खर्च देवू शकतो. तसेच तिने दोन लाख रूपये नुकसान भरपाई मिळण्याची विनंती केलेली आहे.

४ या अर्जाची नोटीस गैरअर्जदारांना पाठविण्यात आली. नि.क्रं. ९ प्रमाणे सर्व गैरअर्जदारांना ती नोटीस मिळाली. गैरअर्जदार क्रं. १ व ३ ते ५ यांच्या तर्फे ॲड.टी.एस.ताजी यांनी वकीलपत्र दाखल केले. उर्वरित गैरअर्जदार कोर्टासमोर हजर झाले नाहीत. कोणत्याही गैरअर्जदाराने त्यांचे लेखी उत्तर दाखल केलेले नाही. त्यामुळे हा अर्ज गैरअर्जदार क्रं. १ व ३ ते ५ यांच्या विरूध्द बिना लेखी उत्तर आणि उर्वरित गैरअर्जदारांविरूध्द एकतर्फी चालविण्यात आला.

५ अर्जदार हिने स्वत:चा पुरावा नि.क्रं. १० प्रमाणे दाखल केलेला आहे . तिच्यावर झालेल्या शारिरिक ,मानसिक आणि आर्थिक छळाबाबत तिने तोंडी पुरावा दिलेला आहे. तिने दिलेला पुराव्यामध्ये तिने तिच्या अर्जामधील गोष्टी पुन्हा सांगीतल्या आहेत. अर्जदाराने केलेले आरोप खोटे आहे हे सांगण्यासाठी कोणताही गैरअर्जदार समोर आलेला नाही. त्यामुळे अर्जदाराने दिलेला तोंडी पुरावा स्विकारण्याशिवाय या न्यायालयाला कोणताही पर्याय नाही. म्हणून अर्जदाराने दिलेल्या पुराव्या बाबत विश्वास ठेवण्यात येतो. त्यामुळे गैरअर्जदारांनी मिळून अर्जदारावर कौटुंबीक हिंसाचार केला आहे हे सिध्द होते.

६ अर्जदाराचा नवरा हा मिस्त्री काम करतो. बडनेरा शहरामध्ये मिस्त्रीकामासाठी रोजाना तिनशे रूपये सहज मिळत असतील. कोणत्याही अकुशल कामगाराला आजच्या युगात तिनशे रूपये रोजाना मजूरी मिळणे सहज शक्य आहे. त्यामुळे अर्जदाराचा नवरा हा दरमहा कमीत कमी नउ हजार रूपये कमावितो असा निष्कर्ष निघतो. त्या कमाईमधील तिसरा हिस्सा अर्जदाराला पोटगी म्हणून देणे उचीत राहील. त्यामुळे अर्जदाराला तिच्या नव—याकडून दरमहा तीन हजार रूपये

पोटगी देणे उचीत राहील.

७ गैरअर्जदारांनी मिळून आणि विशेषकरून गैरअर्जदार क्रं. १ याने अर्जदाराच्या वैवाहिक सुखाच्या स्वप्नांची राख रांगोळी केलेली आहे. आणि त्यामुळे अर्जदार ही तिच्या नव–याकडून नुकसान भरपाई मिळविण्यास पात्र आहे. तिच्या नव–याची कमाई पाहली असता आणि अर्जदाराचे जे नुकसान झाले आहे ते पाहीले असता अर्जदाराला तिच्या नव–याकडून रूपये पन्नास हजार नुकससान भरपाई देणे उचीत राहील. म्हणून खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१ अर्ज मंजूर करण्यात येतो.

२ गैरअर्जदार क्रं. १ शेख ईरफान सुल्हान चौधरी यांनी अर्जदार नसीम परवीन शेख ईरफान चौधरी यांना जानेवारी २०१८ पासून दरमहा रूपये तीन हजार पोटगी दयावी.

३ गैरअर्जदार क्रं. शेख ईरफान सुल्हान चौधरी यांनी अर्जदार नसीम परवीन शेख ईरफान चौधरी यांना नुकसान भरपाई म्हणून रूपये पन्नास हजार दयावेत.

(केतनकुमार तेलगांवकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
दारव्हा.

दिनांक :०२/०३/२०१९